# जाहीर नोटीस

तमाम नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकास नियंत्रणाखालील काही क्षेत्र शासन निर्णय क्रं. पीसीएन १६९७/९३४/प्र.क्रं.८९/९७/ नवि/-२२, दि. १५/११/१९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रणा खाली आलेले आहे.

वाकड – कस्पटे वस्ती ते पिंपरी काळेवाडी येथील प्रस्तावित ग्रेडसेपरेटरसाठी कस्पटे वस्तीच्या दक्षिण बाजूकडील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे थेरगाव स.नं. १३ मध्ये नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत ९.० मी. रस्ता घोषित करणेच्या प्रस्तावास मा. "ब" प्रभाग समितीचा ठराव क्रं. १९ दि.०७/०९/२०१८ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे व त्याप्रमाणे वाकड – कस्पटे वस्ती ते पिंपरी काळेवाडी येथील प्रस्तावित ग्रेडसेपरेटरसाठी कस्पटे वस्तीच्या दक्षिण बाजूकडील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे थेरगाव स.नं. १३ मध्ये नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत ९.० मी. रस्ता घोषित करणेचा इरादा महानगरपालिका या नोटीसव्दारे जाहिर करीत आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन सकाळी १० ते संध्याकाळी ५.४५ वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवासच्या विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांवर योग्य तो विचार करून इराद्याप्रमाणे म्युनिसिपल रस्ता घोषित करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकत/सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्र. २६
दि. ८/१२/२०१८